**दूधातील भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रोटीन्स तपासणीवर आधारीत गाय दूध किमान २.९ टक्के व म्हेरा दूध किमान ३.१ टक्के प्रोटिन्स अनिवार्य करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक एमएलके १००९/८८२६/प्र.क्र.६६/पदुम**

**मंत्रालय - बिस्तार, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक २५ ऑगस्ट ,२००९**

वाचा :- आयुक्त दुग्धविकास महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक आदुवि-८/गुणनियंत्रण/प्रोटीन्स/प्र.क्र.९८,दिनांक २७.४.२००९

**प्रस्तावना :-**

शासकीय दूध योजना येथे संकलित होणा-या दूधास काहीवेळा ठराविक काळानंतर अनैसर्गिक चव व वास येत असल्याचे आढळून येते. निकडीच्या वेळी अशा दूधापासून दूध भुकटी बनविण्यास ती बी.आय.एस.मानकाप्रमाणे बसत नसल्याचे दिसून आले आहे. सर्व प्रकारच्या गायीच्या दूधात नैसर्गिकरित्या लॅक्टोज व प्रथिने यांचे अनुपान (Ratio) ठराविक असतो. दुधातील एस.एन.एफ. चे प्रमाण वाढविण्यासाठी दूधात भेसळ करण्यात आली तर अनुपान तोच रहातो. परंतु भेसळीमध्ये वापरले जाणारे घटक रासायनिकदृष्टया उदासिन (न्यूट्रल) असल्यामुळे दूधाची धनता वाढते व दूधातील प्रोटीन्सची टक्केवारी कमी होते. दूधातील लॅक्टोज तपासणीस फार वेळ लागतो. परंतु पाईन्स पध्दतीने दूधातील प्रोटिन्सची तपासणी टक्केवारी ५ ते ६ मिनिटात होऊ शकते. या प्रोटिन्स तपासणीमुळे दुधातील प्रोटिन्सची टक्केवारी कळून येते व त्यानुसार दूध भेसळयुक्त आहे किंवा कसे ते समजते. यामुळे दूधातील होणा-या भेसळीवर निर्बंध आणण्यासाठी राज्यात दूध स्विकृतीपूर्वी दुधातील प्रोटिन्सची तपासणी करण्याबाबतचा प्रसतव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

सर्वसाधारणपणे नैसर्गिक दुधात लॅक्टोज , प्रोटिन्स व मिनरलर्स यांचा अनुपान (Ratio) बघता ८.५ टक्के एस.एन.एफ. च्या दुधात कमीत कमी ३ टक्के प्रथिने असतात. अन्न व औषध प्रतिबंधक कायदा तसेच नवीन येणारे फूड.लॉ प्रमाणे वितरणास पाठविण्यात येणा-या दूधात प्रथिने नमूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे कायदयाचे अनुपालन व दूध भेसळीवर नियंत्रण यासाठी दूधातील प्रोटिन्सची तपासणी आवश्यक आहे. त्यास्तव दूधातील होणारी भेसळ रोखण्यासाठी राज्यात प्रोटिन्स तपासणीवर आधारित

(पाईन्स पध्दतीने ) ८.५ टक्के एस.एन.एफ. असलेल्या गाय दूधात किमान २.९ टक्के व ९.० टक्के एस.एन.एफ. असलेल्या म्हैस दूधात किमान ३.१ टक्के प्रोटिन्स अनिवार्य करण्यात येत आहे. यापेक्षा कमी प्रथिने असलेले दूध स्विकारु नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-

(सु.ज.सोब्रितकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास , महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-१८

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, सहकारी दूध महासंघ मर्या.,गोरेगांव,मुंबई

महाव्यवस्थापक,बृहन्मुंबई दूध योजना,वरळी,मुंबई-१८.

प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, मुंबई / पुणे /नाशिक /औरंगाबाद/अमरावती/नागपूर

सर्व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी

सर्व महाव्यवस्थापक / व्यवस्थापक, शासकीय दूध योजना

मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव,मुंबई

प्रकल्प अधिकारी, दुग्ध प्रकल्प, दापचरी, ता.डहाणू,जि.ठाणे

व्यवस्थापक,पशुपैदास व संगोपन केन्द्र, पालघर

नियंत्रक, गुरे नियंत्रण, गुरांचा बाजार, गोरेगांव (पू),मुंबई-६३